राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांतर्गत मौजे सार्वे बु. ता.पाचोरा, जि.जळगांव येथील पाणी पुरवठा योजनेसाठी सार्वेखाजोळा ल. पा. तलावातून पाणी आरक्षणाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांकः. बिसिंआ २०१५/(४९३/१५)/सिंव्य (धो)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
तारीख: २० /०१/२०१६

वाचा -

१) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १००१/ (१५४/०१/) सिंव्य(धोरण) दिनांक २१ जानेवारी २००३.
२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम दि.२२ एप्रिल,२०११.
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१३/(४६०/१३)/सिंव्य (धोरण) दि. २८/८/२०१४
४) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१३/(४१५/१३)/सिंव्य (धोरण) दि. १६/८/२०१४
५) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव यांचे पत्र क्र.मुअ/ता.पा.वि.म/प्रशा-६/५०१६/सन २०१५, दि. ५/१०/२०१५

प्रस्तावना -

१.० महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०११ यातील कलम ५ मधील १६(क) नुसार जलसंपत्ती प्रकल्पांमधील पाण्याचे क्षेत्रीय वाटप राज्य मंत्रीमंडळाकडून केले जाईल अशी तरतूद करण्यात आली आहे. परंतु दि. २८.८.२०१४ रोजी च्या शासन निर्णयान्वये जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून जिल्हापरिषदा, नगरपंचायती, नगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती, आणि कटक मंडळे (Cantonment Board) यांनी पिण्यासाठी पाणी मागणी केलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांबाबतचे बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्ताव मा.मंत्रीमंडळा समोर मान्यतेस्तव सादर करण्याऐवजी त्यास मा.मंत्री, जलसंपदा विभाग यांच्या स्तरावरुनच मान्यता देण्यात यावी. संदर्भिय पत्र क्र. ५ नुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांतर्गत मौजे सार्वे बु. ता.पाचोरा,जि.जळगांव येथील पाणी पुरवठा योजनेसाठी सार्वेखाजोळा ल.पा.तलावातून पिण्याच्या पाण्यासाठी ०.०५४७ दलघमी पाणी आरक्षण संदर्भाधीन शासन निर्णय क्र.३ च्या अनुषंगाने मंजुरी देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय:-

२.० खालील तक्त्यातील रकाना क्र.२ मध्ये नमुद संस्थेला त्यांचे नावासमोर रकाना क्र.५ मध्ये नमूद पाणी आरक्षणास, परिच्छेद मधील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पाणी आरक्षणाची मागणी करणाऱ्या संस्थेचे नांव	पाणी वापराचा प्रकार (घरगुती)	जलाशय/काल वा नदीचे नांव	मंजूर केलेले पाणी आरक्षण (दलघमी)
१	२	३	४	५
१	राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांतर्गत मौजे सार्वे बु. ता.पाचोरा,जि.जळगांव येथील पाणी पुरवठा योजना	घरगुती	सार्वेखाजोळा ल.पा.तलावातून	०.०५४७

३.० उपरोक्त नमूद प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

१. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१३/ (४१५/२०१३)/सिंव्य (धोरण), दि. १६/८/२०१४ नुसार जिल्हा परिषदा/ ग्रामपंचायती/नगरपालिका/नगरपंचायती/कटक मंडळे या आर्थिक दृष्टया सक्षम नसल्याने त्यांच्याकडून पिण्याच्या पाणी आरक्षणापोटी सिंचन पुन:र्स्थापना खर्च घेण्यात येवू नये.

२. संस्थेकडून शासनाच्या प्रचलित घरगुती दराने दोन महिन्यांची पाणीपट्टी सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी.

३. प्रचलित शासन नियमाप्रमाणे पाणीपट्टी विहित वेळेत भरणे व जलमापन यंत्र (Water Meter) बसविणे सदर संस्थेस बंधनकारक राहील. संस्थेने पाणी मोजमाप करण्याचे दृष्टीने जलमापन यंत्र (Water Meter) बसविल्याशिवाय पाणीपुरवठा सुरु करण्यात येवू नये.

४. आपत्कालीन परिस्थितीत तसेच दुष्काळग्रस्त परिस्थितीत पाण्या अभावी संस्थेने पाण्याची गरज भागविण्याकरिता कमीतकमी ६० दिवस पाणी पुरेल इतक्या क्षमतेचा साठवण तलाव स्वखर्चाने बांधावा. तसेच या कालावधीत पाणी उपलब्ध नसल्यास जलसंपदा विभागाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. कमी पर्जन्यमानाच्या वर्षात आरक्षित परिमाणात कपात करण्याचे अधिकार संबंधीत कार्यकारी अभियंता, यांना राहतील.

५. उद्भव ठिकाणी पाण्याची कमतरता असल्यास संस्थेस आरक्षित पाण्याची शाश्वती देता येणार नाही.

६. सांडपाण्यामुळे जलस्त्रोताचे अथवा नदयांचे प्रदूषण होणार नाही याची संबंधीत संस्थांनी दखल घेण्यात यावी. शा.नि.क्र.पापव २०१३/(प्र.क्र. ४६६/२०१३)/सिंव्य (महसूल) दि. १२/११/१३ मधील अटीचे पालन करणे पाणी वापरकर्त्यांना बंधनकारक राहिल.

७. संस्थेस प्रथम पाणी वापर करण्यास परवानगीचे इरादापत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) देण्यात यावे व करारनामा करण्याकरीता ३ वर्षाची मुदत ठेवावी. प्रथम वर्षी संस्थेने करारनामा केला नाही तर दुसऱ्या वर्षी १ वर्षाचा बांधिलकी /लेखबध्द आकार घेवून करारनामा करता येईल. तिसऱ्या वर्षी करारनामा करताना शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहिल. सदरहू करारनामा झाल्यानंतरच प्रत्यक्ष पाणी परवाना देण्यात यावा. संस्थेने सदर करारनामा विहित मुदतीत न केल्यास संस्थेचे पाणी आरक्षण आपोआप रद्द होईल. त्याप्रकारचे आदेश प्रादेशिक मुख्य अभियंता यांनी काढावेत.

८. जलसंपदा विभागाशी करारनामा करताना बिगरसिंचन पाणी वापरकर्ते अंतिम पाणी मागणी प्रमाणे टप्प्याटप्प्याने पाणीवापर करण्याचे नियोजन नमूद करु शकतील. अंतिम पाणी मागणी प्रमाणे पुरवठा सुरु होईपर्यंत वर्षनिहाय खालीलप्रमाणे आकारणी करण्यात येईल-

अ) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या प्रमाणात पाणीवापर असल्यास लागू दराने आकारणी.

ब) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या पाणीवापरापेक्षा ± १० पाणीवापर (अधिक/कमी) झाल्यास, फरकाच्या वापरास दंडनीय दर लागू दराच्या १.५ पट.

क) उर्वरित प्रमाणाकरिता म्हणजे अंतिम नियोजित पाणीवापर वजा टप्प्यानुसार नियोजित पाणी वापराकरिता, बांधिलकी / लेखबध्द आकार लागू दराच्या ५ टक्के वार्षिक प्रमाणे आकारण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१५१४२४९८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjiv A Tatu

Digitally signed by Sanjiv A Tatu
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SE and Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sanjiv A Tatu
Date: 2016.01.22 15:15:58 +05'30'

(सं.अ.टाटू)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
१० मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
१८. अधीक्षक अभियंता व प्रशासक लाक्षेविप्रा, जळगांव
१९. निवडनस्ती कार्यासन सिंव्य (धोरण)